विल्मा मॅनकिलर



लिंडा लोवेरी

छायाचित्र: जेनिस ली पोर्टर, मराठी: अश्विनी बर्वे

अकरा वर्षांच्या विल्मा मॅनकिलरला माहीत होते की तिच्या पालकांनी एक मोठी चूक केली होती: त्यांनी आपल्या कुटुंबाला ग्रामीण ओक्लाहोमातून एका अनोळखी ठिकाणी आणले होते.

विल्माला माहित होतं की एक दिवस ती ओक्लाहोमाच्या पर्वतरांगांमध्ये परत येईल आणि इतर चेरोकी कुटुंबांसोबत राहील. पण तिच्या अंतर्मनात, ती अधिक ताकद शोधण्याचा प्रयत्न करत होती.

लेखिका लिंडा लोवेरी स्पष्ट करतात की विल्माला तिच्या चेरोकी वारशातून कशी ताकद मिळाली. तसेच, एक तरुण मुलगी १९८५ ते १९९५ पर्यंत चेरोकी राष्ट्राची नेता, चीफ मॅनकिलर कशी बनली हे देखील त्या दाखवतात

विल्मा मॅनकिलर

लिंडा लोवेरी

छायाचित्र: जेनिस ली पोर्टर

मराठी: अश्विनी बर्वे

सॅन फ्रान्सिस्को,
१९५६

विल्मा मॅनकिलर पटकन ब्लँकेटखाली लपली.

हाताने विणलेल्या रजईखाली ती उबदार आणि सुरक्षित होती.

बाहेर, जंगली प्राण्यांच्या किंकाळ्या भिंतींवर आपटून घुमत होत्या.

सॅन फ्रान्सिस्कोमध्ये विल्माची ती पहिली रात्र होती आणि तिला भीती वाटत होती.

तिला लांडग्यांचे ओरडणे माहीत होते. पण बाहेर एकही लांडगा नव्हता. तिला कोल्ह्यांचे ओरडणे माहीत होते. पण बाहेर एकही कोल्हा नव्हता.

दुसऱ्या दिवशी सकाळी जेव्हा ती उठली, तेव्हा तिला जांभई आली कारण ती खूप कमी झोपली होती.

ते प्राणी का ओरडत होते हे विल्माला जाणून घ्यायचे होते.

ओक्लाहोमामधील तिच्या घरात तिने असे आवाज कधीही ऐकले नव्हते.

ते पोलिसांच्या सायरनचे आवाज होते.

सॅन फ्रान्सिस्को अशा गोष्टींनी भरलेले होते, ज्या विल्माने यापूर्वी कधीही पाहिल्या किंवा ऐकल्या नव्हत्या. तिच्या अपार्टमेंटमधील लिफ्टमध्ये लोक पेट्यांमध्ये गायब होत असत.

रात्रभर त्यांच्या खिडकीबाहेर दिवे चमकत राहिले.

सगळं काही विचित्र आणि भीतीदायक होतं, त्यांच्या जुन्या घरापेक्षा खूपच वेगळं.

विल्मा मनातल्या मनात ओक्लाहोमातील मॅनकिलर-फ्लॅट्स येथील तिच्या आजोबांच्या घरी परत गेली.

त्यांचे कुटुंब तिथे आनंदी होते. ते इतर चेरोकी कुटुंबांच्या अगदी जवळ राहत होते.

त्यांच्याकडे पिण्यासाठी झऱ्याचे पाणी , हरणे आणि कोल्हे असलेली हिरवीगार जंगले आणि त्यांच्या वडिलांनी बांधलेले घर होते.



पण विल्माचे वडील, चार्ली मॅनकिलर, यांना अनेकदा पैशांची चिंता असायची.

नऊ मुले असल्यामुळे घरात नेहमीच पैशांची कमतरता भासत असे.

त्यांना आपल्या मुलांना सर्वोत्तम शाळा, सर्वोत्तम घर आणि सर्वोत्तम आयुष्य द्यायचे होते.

जेव्हा विल्मा दहा वर्षांची होती, तेव्हा अमेरिकन सरकारने स्थानिक इंडियन लोकांसाठी एक योजना आखली.

शहरात स्थलांतरित होणाऱ्या इंडियन कुटुंबांना घरे आणि नोकऱ्या देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते.

रात्री, विल्मा आणि तिच्या भावंडांनी बातमी ऐकण्यासाठी बेडरूमच्या दाराला कान लावले.

बेडरूममध्ये त्यांचे आई-वडील घर बदलण्याबद्दल बोलत होते. ते शिकागो, न्यूयॉर्क आणि डेट्रॉइटसारख्या शहरांबद्दलही बोलले. शहरात शाळा चांगल्या असतील का?

तिथे त्यांच्या मुलांचे आयुष्य सुखी असेल का?



घर सोडून शहरात जावे लागत असल्यामुळे विल्माला खूप वाईट वाटले.

पण आईवडिलांना शहरात स्थायिक होण्याचा निर्णय आवडला होता.

ऑक्टोबर १९५६ मध्ये, ते कुटुंब त्यांच्या वडिलोपार्जित घरातून, मॅनकिलर फ्लॅट्समधून, बाहेर पडले.

गाडी चालवताना विल्मा गाडीच्या खिडकीतून बाहेरच्या दृश्याकडे काळजीपूर्वक पाहत होती.

तिला तिच्या जुन्या घराविषयीच्या सर्व आवडत्या आठवणी जपायच्या होत्या: पक्ष्यांचे रंग, झाडांचे आकार, प्राण्यांचे आवाज.

त्यांच्या नव्या घरातील रंग, आकार आणि आवाज भीतीदायक – आणि क्रूर होते.

जेव्हा विल्माच्या नवीन शिक्षिकेने शाळेत तिचे नाव पुकारले, तेव्हा वर्गातील सर्व मुले हसली.

चेरोकी जमातीमध्ये, 'मॅनकिलर' ही त्यांच्या जमातीचे रक्षण करणाऱ्या व्यक्तीला म्हटले जात असे.

पण शाळेतील मुलांना तो एक विनोद वाटला.

त्यांनी विल्माला तिच्या बोलण्याच्या पद्धतीवरून आणि उच्चारांवरून चिडवले.

त्यांना विल्माने घातलेले कपडेही खूप विचित्र वाटले.

जेव्हा विल्मा शाळेतून घरी आली, तेव्हा तिला दुकानांच्या खिडक्यांमध्ये पाट्या दिसल्या.

त्यावर लिहिले होते: "कुत्रे आणि आदिवासींना प्रवेश करण्यास मनाई होती."

विल्माला असे वाटले की जणू ती चंद्राच्या दुसऱ्या बाजूला गेली आहे.



स्वतःला दिलासा देण्यासाठी विल्माने तिच्या जुन्या घराचा विचार केला: आकाशात उंच भरारी घेणारे गरुड, झाडांच्या शेंड्यांवरून सळसळणारा वारा.



तिने त्या चेरोकी लोकांचा विचार केला ज्यांनी अनेक काळ संघर्ष केला होता.

सुमारे १५० वर्षांपूर्वी, अनेक चेरोकी लोकांना त्यांची घरे सोडून दुसरीकडे जाण्यास भाग पाडले गेले.

त्यांच्यासाठी तो एक भयंकर प्रवास होता.

त्यांच्या दुःखद प्रवासाला 'अश्रूंचा मार्ग' म्हटले जात असे.

तिच्या वडिलांकडून आणि नातेवाईकांकडून अनेकदा तिने या गोष्टी ऐकल्या होत्या.

"अश्रूंचा मार्ग", १८३८

खूप वर्षांपूर्वी, विल्माच्या कुटुंबीयांनी तिला सांगितले की ओक्लाहोमामध्ये एकही चेरोकी राहत नव्हता.

त्याचे घर आग्नेयेला होते. त्यांना ती भूमी खूप प्रिय होती!

डोंगरांवर हलका पाऊस पडायचा.

तिथे झाडांवर सफरचंद, आलुबुखार आणि पीच लागत असत.



पण गोऱ्या लोकांना आग्नेयेकडील हिरवीगार भूमी बळकावायची होती.

त्यानंतर अध्यक्ष अँड्र्यू जॅक्सन यांनी ठरवले की आग्नेय भागात राहणाऱ्या इंडियनपेक्षा श्वेतवर्णीय वसाहतकार त्यांच्यासाठी अधिक महत्त्वाचे आहेत.

१८३० मध्ये राष्ट्रपतींनी इंडियन रिमूव्हल ॲक्टवर स्वाक्षरी केली

नंतर तो कायदा झाला.

कायद्यानुसार सर्व चेरोकी लोकांना जॉर्जिया, अलाबामा, उत्तर आणि दक्षिण कॅरोलिना, टेनेसी आणि व्हर्जिनिया सोडून जाणे आवश्यक होते.

चेरोकी लोकांनी आपली वडिलोपार्जित जमीन सोडण्यास नकार दिला.

त्यांचे त्यांच्या घरांवर आणि जमिनीवर प्रेम होते.

म्हणून, १८३८ मध्ये राष्ट्राध्यक्ष व्हॅन ब्युरेन यांनी तेथे सैन्य पाठवले.

चेरोकी लोकांना त्यांच्या लाकडी घरांतून ओढत बाहेर काढले.

सैनिकांनी चेरोकी लोकांना गाड्यांमध्ये भरले.

सैनिकांनी पळून जाणाऱ्या चेरोकी लोकांवर गोळ्या झाडल्या.

रणशिंग वाजले.

गाड्यांची चाके गरगर फिरली.

मुलांनी त्यांच्या डोंगरावरील घरांचा निरोप घेतला.

त्यानंतर चेरोकींनी पाऊस, गारा आणि बर्फातून

१२०० मैल प्रवास केला.

जेव्हा त्यांच्या गाड्या नादुरुस्त झाल्या, तेव्हा लोकांना पायी चालावे लागले.

पुढील दोन वर्षांत, अंदाजे १७,००० चेरोकी लोकांना पश्चिमेकडे पाठवण्यात आले.

वाटेत चार हजार लोकांचा मृत्यू झाला.

सैन्याने चेरोकी लोकांना, पुढे ओक्लाहोमा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात सोडून दिले.

तिथे कोणतेही चर्च किंवा शाळा काहीही सुविधा नव्हत्या.

लांबच्या प्रवासामुळे अनेकांची मुले, आईवडील, आजीआजोबा आजारी पडले होते.

त्यांच्याकडे त्याच्या 'आत्म्या'शिवाय काहीही उरले नव्हते.

केवळ त्याच्या ‘आत्म्या’मुळेच ते अजून जिवंत होते.

विल्माने 'अश्रूंच्या मार्गाची' कथा नेहमी आपल्या हृदयात जपून ठेवली होती.

विल्मा ही त्या वाटेवर रडणाऱ्यांची पणती होती.

विल्मा सॅन फ्रान्सिस्कोमध्येही रडली.

तिथे तिला फक्त एकाच गोष्टीबद्दल नशीबवान वाटले.

ज्यांना ओक्लाहोमा येथे पाठवण्यात आले होते, ते त्यांच्या जुन्या घरी कधीही परतले नाहीत.

पण विल्माला माहित होतं की एक दिवस ती तिच्या जुन्या घरी परत जाईल.

१९७७ मध्ये ओक्लाहोमा येथील आपल्या घरी ती परतली. पण तिला परत यायला वीस वर्षांपेक्षा जास्त काळ लागला.

तोपर्यंत, म्हणजे १९७७ साली, विल्माला स्वतःच्या दोन मुली होत्या – जीना आणि फेलिशिया.

त्यानंतर विल्मा आपल्या मुलींसोबत मॅनकिलर फ्लॅट्सवर परत आली.

विल्माला तिच्या चेरोकी मित्रांना भेटून आनंद झाला.

आपल्या खिडकीतून रॉबिन आणि ब्लूबर्ड पक्षी पाहून तिला खूप आनंद झाला.

चांदण्यात कोयोटांचे ओरडणे ऐकले, पण तिला भीती वाटली नाही.



विल्माला लवकरच चेरोकी नेशनमध्ये नोकरी मिळाली.

चेरोकी लोकांची एक नव्हे तर दोन राष्ट्रीयता होत्या: एक युनायटेड स्टेट्सची आणि दुसरी चेरोकी नेशनची.

वॉशिंग्टन डीसी येथील अमेरिकन सरकारने सर्व महत्त्वाचे निर्णय घेतले.

ओक्लाहोमातील तालेक्वा येथील चेरोकी सरकार चेरोकी राष्ट्राचे सर्व प्रमुख निर्णय घेत असे.

विल्माचे काम पूर्व ओक्लाहोमाभर प्रवास करून चेरोकी लोकांना भेटणे हे होते.

त्यांच्यापैकी बरेच जण खूप गरीब होते.

त्यांच्या घरात वीजही नव्हती आणि पाणीही नव्हते.

विल्माने लोकांना त्यांची घरे अधिक सुरक्षित आणि चांगली बनवण्यासाठी मदत केली.

१९८३ सालच्या एका दिवशी, विल्मा कामावर जात होती.

ती काहीतरी विचार करत कच्च्या रस्त्यावरून चालत होती.

काल, चेरोकी राष्ट्राच्या प्रमुखाने तिला एका नोकरीबद्दल सांगितले.

त्यांची इच्छा होती की विल्माने त्यांची सहाय्यक व्हावे आणि उपप्रमुख पदासाठी निवडणूक लढवावी.

विल्माला विचारण्यात आले, ही तिच्यासाठी खूप मोठी सन्मानाची गोष्ट होती!

चेरोकी राष्ट्रामध्ये ते दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च पद होते.



पण विल्मा शांत स्वभावाची होती.

उपप्रमुख होण्यासाठी तिला निवडणूक जिंकावी लागली.

पण तिला गर्दीत लोकांशी बोलायला आवडत नसे.

तिला टेलिव्हिजनवर मुलाखत द्यायची नव्हती.

"नाही," ती प्रमुखाला म्हणाली.

हे ऐकून प्रमुख निराश झाले.

"यावर खोलवर विचार कर," ते म्हणाले.

आता, कच्च्या रस्त्यावरून गाडी चालवताना विल्माला प्रश्न पडला की तिचा निर्णय योग्य होता की नाही.

अचानक, तिला निष्पर्ण (ओक) झाडांमध्ये काहीतरी दिसले.

तिने आपली स्टेशन वॅगन थांबवली आणि खिडकीतून बाहेर पाहिले.

एक जुनी, मोडकळीस आलेली बस उभी होती.

बसच्या खिडक्यांना पडदे लटकलेले होते आणि एका दोरीला कपडे टांगलेले होते.

ते खरंच कोणाचं तरी घर होतं का ?

विल्मा तिच्या गाडीतून उतरली आणि बसच्या जवळ गेली.

आता तिला दिसले की बसमध्ये एक कुटुंब राहत होते.



बसला छत नव्हते.

पावसात काय होईल? तिला खूप आश्चर्य वाटले.

विल्माला तिच्या अंतर्मनात काहीतरी जाणवले.

जेव्हा ती मुलगी होती, तेव्हा अमेरिकन सरकारने सॅन फ्रान्सिस्कोमधील इंडियन लोकांना चांगल्या जीवनाचे वचन दिले होते

पण अमेरिकन सरकारने आपले वचन मोडले.

जर विल्मा उपप्रमुख झाली, तर तिला चेरोकी लोकांचे जीवन बदलण्याची काही प्रमाणात शक्ती मिळेल.

तिला माहीत होतं की ती तिची वचनं नक्कीच पाळेल.



मग विल्मा पटकन प्रमुखाच्या घरी गेली.

तिला त्यांना काहीतरी सांगायचे होते. विल्माची आता नेतृत्व करण्याची वेळ आली होती.

ती उपमुख्य पदासाठी निवडणूक लढवणार होती.



त्यानंतर विल्मा तिच्या निवडणूक प्रचारात व्यग्र झाली. तिने आपला लाजाळूपणा दूर करून लोकांच्या गर्दीला संबोधित केले.

विल्माने लोकांना तिला मत देण्याचे आवाहन केले.

चेरोकी लोकांना तिने आधीपासूनच खूप मदत केली होती तेव्हापासून ते तिचे आभारी होते.

जेव्हा विल्मा लोकांकडे गेली, तेव्हा त्यांनी तिचे आपुलकीने स्वागत केले.

पण अचानक लोकांची मैत्री आणि जिव्हाळा नाहीसा झाला. अनेकजण तर संतप्तही झाले.

काहीतरी खूपच चुकीचं घडत होतं.

विल्माला त्याची जाणीव होत होती.

मग लवकरच सत्य समोर आले.

लोक विल्माच्या पाठीमागे बोलत होते.

"चेरोकी लोकांमध्ये यापूर्वी कधीही एखादी महिला उपप्रमुख झालेली नव्हती," असे ते म्हणाले.

"ते पद पुरुषांसाठी आहे," ते म्हणाले.

हे ऐकून विल्माला धक्काच बसला!

ती किती विचित्र कल्पना होती!

इतिहासात चेरोकी पुरुषांनी नेहमीच त्यांच्या स्त्रियांना समान वागणूक दिली आहे

चेरोकी स्त्रिया वैद्य होत्या.

चेरोकी स्त्रिया योद्ध्या होत्या.

महिला परिषदेच्या सदस्य होत्या.

फक्त पुरुषच चांगले नेते होऊ शकतात, असे कोणी कसे म्हणू शकेल?

चेरोकी लोकांनी ही कल्पना गोऱ्या लोकांकडून घेतली का? विल्माला आश्चर्य वाटले.



जेव्हा गोरे लोक अमेरिकेत आले, तेव्हा ते आपल्यासोबत काही नवीन कल्पना घेऊन आले.

त्याच्या काही कल्पना चांगल्या होत्या.

पण काही कल्पना चुकीच्या होत्या.

गोऱ्या लोकांमध्ये एक असा समज होता की पुरुष स्त्रियांपेक्षा अधिक महत्त्वाचे असतात.

विल्माने सिद्ध केले की गोऱ्यांची कल्पना चुकीची होती.

आपल्या भाषणांमध्ये ती स्त्री असण्याबद्दल कधीच बोलली नाही.

ती फक्त चेरोकी लोकांच्या आशा आणि स्वप्नांबद्दल बोलली.

घरे, रुग्णालये आणि बाल केंद्रांसाठी पैसे देण्याचे वचन दिले.

तिने आपल्या लोकांना त्यांची शहरे सुधारण्यास मदत करण्याचे वचन दिले.

पण त्रास थांबला नाही.

पण विल्मा सुद्‌धा थांबली नाही.

कोणीतरी विल्माच्या गाडीचे टायर कापले.

अनोळखी लोकांनी विल्माला फोनवर शिवीगाळ केली आणि तिच्यावर ओरडले.

कोणीतरी विल्माला जीवे मारण्याची धमकी दिली.

विल्माच्या सभोवतालची प्रत्येक गोष्ट वावटळीसारखी गरगरत होती.

पण आतून, विल्मा पूर्णपणे शांत राहिली.

तिने शक्तीसाठी स्वतःच्या अंतर्मनाचा शोध घेतला.

फार पूर्वी, तिचे लोक 'अश्रूंच्या मार्गावरून' वाचले.

स्वतः लहान असताना सॅन फ्रान्सिस्कोमधून पळून गेली होती.

'ट्रेल ऑफ टीयर्स'मधील रडणारे लोक वाचले कारण त्यांना चेरोकी लोकांच्या चालीरीती माहित होत्या.



तुम्ही वाईट गोष्टींचा विचार करू नये.

तुम्ही फक्त चांगल्या गोष्टींचाच विचार केला पाहिजे.

जरी तुम्हाला असे वाटले की तुम्ही त्यात कधीच यशस्वी होणार नाही, तरीही तुम्ही पुढे जात राहिले पाहिजे.

यालाच ‘चांगले मन’ असणे म्हणतात.

जर तिने चेरोकी जीवनशैलीचा अवलंब केला, तर ती जगू शकेल आणि निवडणूकही जिंकू शकेल, हे विल्माला माहीत होते.

शेवटी, चेरोकी लोकांनी मतदान केले.

चेरोकी लोकांनी चीफ स्विमर आणि विल्मा मॅनकिलर यांना मत दिले

१४ ऑगस्ट १९८३ रोजी, विल्मा उपप्रमुख झालेल्या पहिल्या चेरोकी महिला ठरल्या.

पण ती तर फक्त सुरुवात होती.



१९८५ मध्ये विल्मा पहिल्यांदा प्रमुखाच्या खुर्चीवर बसली.

"तुम्ही तिथे अगदी सहज बसलेल्या दिसत आहात," अशी कोणीतरी टिप्पणी केली.

लोकांनी विल्माला मिठी मारली.

विल्मासाठी लोकांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

जेव्हा चीफ स्विमरने वॉशिंग्टन, डी.सी. मध्ये नोकरी स्वीकारली, तेव्हा विल्मा चेरोकी नेशनची प्रमुख बनली

विल्माला माहित आहे की प्रमुख म्हणून तिचे काम खूप कष्टाचे असणार आहे.

पण तिला भीती वाटली नाही.

तिला वाटले की, 'अश्रूंचा मार्ग' चालून गेलेले चेरोकी लोक तिच्यासोबत आहेत.

त्यांची ताकद हीच तिची ताकद होती, अगदी जशी ती सॅन फ्रान्सिस्कोमध्ये लहान मुलगी असताना होती.

विल्मा ओक्लाहोमा येथील तिच्या घरी आली

आता ती चीफ मॅनकिलर होती, चेरोकी इतिहासातील पहिली महिला प्रमुख.

अंतिम शब्द

प्रमुख मॅनकिलर यांनी आपला शब्द पाळला. त्यांनी हे सुनिश्चित केले की चेरोकी लोकांना घरे, रुग्णालये आणि उत्तम शहरे बांधण्यासाठी निधी मिळेल. लोकांनी त्यांच्या कामाची इतकी प्रशंसा केली की विल्मा यांनी १९८७ आणि १९९१ मध्ये दोन निवडणुका जिंकल्या

वर्षानुवर्षे, त्यांनी अनेक लोकांना, विशेषतः मूळ अमेरिकन महिलांना मदत केली. आता चेरोकी मुलींना कळले होते की, त्यांची इच्छा असल्यास त्यादेखील मोठ्या होऊन प्रमुख बनू शकतात. आणि जे मूळ अमेरिकन नव्हते, त्यांनाही आता इंडियन प्रमुखांविषयी एक स्पष्ट कल्पना आली होती. ते खरेखुरे लोक होते, जे दररोज कामावर जात आणि आपल्या शासनाचे मार्गदर्शन करत होते.

१९९५ मध्ये, विल्मा मॅनकिलरने ठरवले की आता तिला प्रमुखपद सांभाळायचे नाही. आता ती जगभर प्रवास करून लोकांना मूळ अमेरिकन लोकांच्या जीवनशैलीबद्दल शिकवते. तिने सर्व प्रकारच्या संकटांचा सामना केला आहे, पण टिकून राहण्याची शक्ती तिला नेहमीच मिळाली आहे. ती म्हणते की तिच्या कष्टांनीच तिला नेतृत्व करायला शिकवले.

ती खंबीरपणे उभी आहे. ती एक चेरोकी स्त्री आहे.

महत्त्वाच्या तारखा

१८३० – अमेरिकन काँग्रेसने इंडियन रिमूव्हल ॲक्ट मंजूर केला.

१८३८ – चेरोकींच्या "अश्रूंच्या मार्गाची" सुरुवात झाली.

१८३९ - ओक्लाहोमा येथील टाहलेक्वा हे चेरोकी राष्ट्राचे आदिवासी मुख्यालय बनले

१८ नोव्हेंबर, १९४५ – विल्मा पर्ल मॅनकिलर यांचा जन्म, मॅनकिलर-फ्लॅट्स, अडायर काउंटी, ओक्लाहोमा येथे झाला.

१९५६ – कुटुंबासह सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्निया येथे स्थलांतर.

१९६९ – कॅलिफोर्नियातील तुरुंग असलेल्या अल्काट्राझ बेटावरील मूळ अमेरिकन लोकांच्या ताब्याला पाठिंबा दिला

१९७७ - एका दुर्दैवी वैवाहिक जीवनानंतर, मुली जीना आणि फेलिशिया यांच्यासह ओक्लाहोमा येथे परत आल्या आणि चेरोकी नेशनसाठी काम करण्यास सुरुवात केली.

१९७९ – कार अपघातातून थोडक्यात बचावले; बरे होण्यासाठी एक वर्ष लागले.

१९८१ – ओक्लाहोमा राज्यातील बेल शहरात, पाणीपुरवठा प्रणाली

१९८३ - चेरोकी राष्ट्राचे उपप्रमुख म्हणून निवड

१९८५ - चीफ स्विमर निघून गेल्यावर विल्मा चीफ बनते.

१९८६ - चार्ली सोपशी विवाह

१९८७ - प्रमुख म्हणून निवड

१९९० – शस्त्रक्रियेदरम्यान भावाकडून किडनी मिळाली.

१९९१ - दुसऱ्या पूर्ण कार्यकाळासाठी प्रमुखपदी निवड